हिंदी चित्रपटाच्या नायकाला गिटार, पियानो, अॅकॉर्डियन, बासरी यांसारखी वाद्यं (नायिकेला किमानपक्षी पियानो!) जशी अवगत असावी लागतात तशी साध्यासुध्या गाण्यांबरोबर भजन, गझल अन् कव्वालीदेखील म्हणता यावी लागते. वेषांतर करून कव्वाली म्हणणाऱ्या नायक-नायिकांना एकवेळ प्रेक्षक सहज ओळखू शकतील, पण खलनायकादी मंडळी नाही ओळखू शकत. विनोदाचा भाग सोडून द्या. पण हिंदी चित्रपटात कव्वाली रूळली खरी. अलीकडे 'बॉम्बे' मधल्या 'कहना ही क्या' या गाण्यात ए. आर. रहमाननं अशीच 'किंचित कव्वाली' टाकून रंगत आणली होती. हिंदी चित्रपटातल्या हजार गोष्टी खटकतील, पण कव्वाली नाही खटकणार. अलीकडे कव्वालीचा वापर कमी झाला असला तरी जुन्या काळात विशेषत: साठ अन् सत्तरच्या दशकात कव्वालीनं धमाल उडवली होती.

'गझल' नावाच्याच चित्रपटात मदनमोहननं काही उत्तम गझला दिल्या होत्या अन् त्या चित्रपटाचं ते (एकमेव) आकर्षण होतं. त्याचप्रमाणे 'कव्वाली की रात' (१९६४) नावाचाही एक चित्रपट येऊन गेला. पण त्यातली एकही कव्वाली आज आठवणीत नाही. याउलट 'कव्वाली' हा विषय नसलेल्या इतर अनेक चित्रपटांमधली कव्वाली गाजली.

कव्वाली या प्रकाराला गझलप्रमाणे शब्दरचनेचं वा विशिष्ट वृत्ताचं बंधन नाही. मात्र, ती गायली जाते एका खास पद्धतीनं. मुळात हा मुस्लिम धर्मीयांच्या प्रार्थनागीताचा एक प्रकार. दर्गा, खानका यांसारख्या ठिकाणी मुस्लिम भाविक नित्यनेमानं जी भक्तिगीतं गायचे तीच ही कव्वाली. (कव्वालीचीच दुसरी बहीण म्हणजे 'नात') पुढे हा प्रकार भक्तिगीताच्या चाकोरीतून बाहेर पडून मैफलीत आला. हिंदी चित्रपट संगीतानं इतर सर्व प्रकारांसमवेत कव्वालीही आपलीशी केली.

हिंदी चित्रपटात पहिली कव्वाली कधी चित्रित झाली ते सांगणं कठीण आहे. मात्र, पहिली गाजलेली कव्वाली होती १९४५ सालच्या 'झीनत' मधली "आहें न भरी शिकवे न किये!' या चित्रपटाला मीरसाहेब अन् हफीजखाँ या दोघांचं संगीत असलं तरी ही कव्वाली केली होती हफीजखाँ यांनी. नूरजहाँ, जोहराबाई अन् कल्याणी या त्याकाळच्या 'टॉप' च्या गायिकांनी गायलेलं हे गाणं पडद्यावर साकार केलं होतं स्वत: नूरजहाँबरोबर श्यामा अन् शशिकला या त्यावेळच्या नवोदित नट्यांनी. त्यानंतरही चित्रपटात कव्वाली अधूनमधून येत राहिली. ओ. पी. नय्यरच्या 'मिस्टर अँड मिसेस फिफ्टी फाईव्ह' मधली, मोहम्मद रफीची 'मेरी दुनिया लुट रही थी,' नय्यरच्याच 'नया अंदाज' मधली किशोरकुमारची 'अपना तो जमाने मे इतनाही फसाना है' बुलो सी रानीच्या 'अल हिलाल' मधली इस्माईल आझाद आणि पार्टीची 'हमें तो लूट लिया मिलके हुस्नवालोंने,' खय्यामच्या 'फिर सुबह होगी' मधली रफी अन् मुकेशची 'जिस प्यारमे ये हाल हो' यासारखी कव्वाली त्या त्या वेळी गाजली. मात्र कव्वालीला खऱ्या अर्थानं बहर आला तो 'बरसात की रात' पासून. संगीतकार रोशनच्या कारकिर्दीला कलाटणी देणाऱ्या या चित्रपटातली सगळीच गाणी सुमधुर होती. आजही या चित्रपटाच्या आठवणीसरशी डोळ्यासमोर येते सौंदर्यवती मधुबाला अन् मनात घुमू लागते त्यातली भन्नाट कव्वाली. 'बरसातकी रात' मध्ये एक नव्हे तर तीन कव्वाली होत्या. (विशेष म्हणजे त्या तिन्ही गाजल्या) 'जी चाहता है चूम लूँ' अन् 'निगाहें नाझ के मारों का हाल' या कव्वालींनी तर रंगत आणलीच, पण कळस गाठला 'ना तो कारवाँ की तलाश है' या तीन भागांतल्या (दुसरा अन् तिसरा भाग 'ये इश्क इश्क है') अनोख्या कव्वालीनं. साहिरनं लिहिलेली अन् मन्ना डे, रफी, आशा भोसले, सुधा मल्होत्रा, एस. डी. बातिश यांनी गायलेली ही कव्वाली आजही या प्रकारातला मानदंड समजली जाते.

'बरसात की रात' मधली कव्वाली केवळ 'फ्लूक' म्हणून गाजली नाही हे दाखवून देऊन रोशननं पुढे या प्रकारातला आपला हातखंडा सिद्ध केला. 'हसीनों के जलवे परेशान रहते' (बाबर), 'चाँदी का बदन सोने की नजर' (ताजमहल), 'परदा उठे सलाम हो जाए' (दिल ही तो है), 'वाकिफ हूँ खूब इश्क से' (बहू बेगम), यासारख्या कव्वाली रोशननं अस्सल ढंगात पेश केल्या. पण या सर्वांपेक्षा उठून दिसली ती रोशननं 'दिल ही तो है' साठी दिलेली आशा भोसलेच्या आवाजातली 'निगाहें मिलाने को जी चाहता है' ही कव्वाली. आशाला आपल्या गायकीचा असस्ल नूर दाखवण्याची संधी या गाण्यानं दिली. (त्यातली ती सरगम तिनं केवढ्या तयारीनं पेश केली होती!)

रोशन हा 'कव्वालीचा बादशहा' होता हे तर खरंच. पण अन्य संगीतकारांची कव्वालीही आपल्याला तेवढीच आवडू शकते. सी. रामचंद्र या 'हरफनमौला' संगीतकारानं 'आझाद' साठी केलेली 'मरना भी मुहब्बत मे' ही कव्वाली रघुनाथ जाधव आणि सहकाऱ्यांनी दमदारपणे गाऊन जाणकार श्रोत्यांची दाद

कव्वालीची दास्तान



मिळविली. याच सी. रामचंद्रच्या 'बारिश'साठी रफी, 'तलत, अन् फ्रान्सिस वाझ यांनी म्हटलेली 'सूरत हो तो ऐसी हो' ही कव्वाली आज फारशी आठवणीत नसेल. पण त्या चालीवर बेतलेलं शंकर जयकिशनचं 'फूल सा चेहरा,' (रात और दिन) हे रफीचं गाणं अधिक भाव खाऊन गेलं. शंकर-जयकिशनच्या संगीतात विविधता भरपूर असली तरी 'आरजू' मधल्या 'जब इश्क कहीं हो जाता है' सारखा अपवाद सोडता ते कव्वालीत रमले नाहीत.

ओ. पी. नय्यरनं आपला रांगडा ढंग जोपासताना 'सुभान अल्ला, हँसी चेहरा' (काश्मीर की कली) अन् 'कजरा मुहब्बत वाला' (किस्मत) सारखी फडकती कव्वाली दिली. गुणवत्ता असूनही लोकप्रियतेत मागे राहिलेल्या दत्ता नाईक अर्थात एन. दत्ता यानं 'साधना' साठी 'आज क्यूं हम से परदा है' सारखी कव्वाली देऊन वाहवा मिळवली. अन् तितकीच भाव खाऊन गेली ती एन. दत्तानं 'काला समंदर'या स्टंट चित्रपटासाठी दिलेली 'मेरी तसवीर ले कर क्या करोगी' ही तडाखेबंद कव्वाली. रफी अन् आशा यांनी खुलविलेली ही कव्वाली कुणी लिहिली असेल? चक्क आनंद बक्षी यानं! एन. दत्ताच्या या दोन्ही कव्वालींमध्ये गाणाऱ्या बलबीर या गायकाचं 'दुर्दैव' हे की त्याला कायम सहगायकाचंच स्थान मिळालं. बलबीरनं गायलेलं सोलो गाणं मला तरी माहीत नाही.

मुस्लिम पार्श्वभूमीच्या सामाजिक अन् ऐतिहासिक चित्रपटांमध्ये कव्वालीला हमखास स्थान मिळायचं. 'मुगल-ए-आझम' सारख्या भव्यतेच्या सर्व सीमा पार करणाऱ्या चित्रपटात कव्वाली नसती तरच नवल. 'तेरी मेहफिल मे किस्मत आजमाकर हम भी देखेंगे' या कव्वालीनं या चित्रपटाची रंगत वाढली. बहारच्या भूमिकेतल्या निगारसाठी ठसकेबाज शमशाद बेगम अन् अनारकली मधुबालासाठी कोवळ्या आवाजाची लता अशी स्वरयोजना करून नौशादनं या कव्वालीतला विरोधाभास आणखी नाट्यपूर्ण केला. 'मुकाबला' हा कव्वालीचा स्थायीभाव याच गाण्यात ठळकपणे पहिल्यांदा जाणवला. याच चित्रपटातली लताची 'जब रात है ऐसी मतवाली' ही कव्वालीही तेवढीच बहारीची होती. नंतरच्या काळात मात्र नौशादनं कव्वालीला फारसं महत्त्व दिलं नाही. ('पालकी' मधल्या 'मैं इधर जाऊं या उधर जाऊं' चा अपवाद) काही संगीतकारांनी कव्वाली हळुवार शैलीत पेश केली असली तरी या गायन प्रकाराची खरी मजा त्याच्या जोरकसपणातच आहे. सज्जाद हुसेननं 'रुस्तम सोहराब' साठी दिलेली 'फिर तुम्हारी याद आयी' ही रूढ चाकोरीबाहेरची कव्वाली रफी, मन्ना डे अन् सादात खान या तीनही गायकांनी विलक्षण नजाकतीनं पेश केली. हल्लागुल्ला अन् दंगा नसलेली अवीट गोडीची कव्वाली म्हणून या रचनेचा उल्लेख नेहमीच केला जातो. अनिल विश्वासनं 'हमदर्द' साठी मन्ना डेच्या आवाजात दिलेली 'न हो हम सा जमाने में' ही कव्वालीही तशी 'मर्यादाशील' होती. पण का कोण जाणे, कव्वाली भावते ती खणखणीत ढंगातलीच.

कव्वाली, गझल अन् मुजरा या प्रकारांची सरमिसळ बऱ्याचदा झाली. 'सारे जहाँ से अच्छा' लिहिणाऱ्या डॉ. इक्बाल या श्रेष्ठ ऊर्दू कवीची 'कभी ऐ हकीकत - ए - मुंतेजिर, नजर आ लिबाजे मजाज में' ही प्रसिद्ध गझल मदनमोहननं 'दुल्हन एक रात की' साठी कव्वाली ढंगात बांधली अन् लतानं ती गायलीही बहारदारपणे. चित्रपटात ती आली मुजरागीताच्या रूपात. मदनमोहनचा हाच ढंग उचलून लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी त्यांच्या उमेदीच्या काळात केलेल्या 'अल्लाह ये अदा' (मेरे हमदम मेरे दोस्त) या कव्वालीलाही लतानं तेवढाच न्याय दिला. त्या त्या काळात लोकप्रिय कव्वाली गायकांना चित्रपटात स्थान मिळालं. शंकर शंभु हे प्रख्यात कव्वाल 'बरसात की रात' साठी गाऊन गेले. त्यांच्या नावानं निघालेल्या 'शंकर शंभू' या चित्रपटात त्यांची कव्वाली नसली तरी अजीझ नाज़ाँ अन् जानी बाबू यांनी गायलेली 'हम लूटने आए है' ही कव्वाली होती. जानी बाबू कव्वालनंही 'नूरमहल' या चित्रपटाला संगीत दिलं. पण त्यातल्या कव्वालीपेक्षा जास्त गाजलं ते सुमन कल्याणपूरच्या स्वरातलं 'मेरे महबूब न जा' हे गाणं. खासगी कव्वालीमध्ये उदंड लोकप्रिय ठरलेल्या अजीझ नाज़ाँची 'झूम बराबर झूम' ही गाजलेली कव्वाली आय. एस. जौहरनं 'फाईव्ह रायफल्स' मध्ये उथळ पद्धतीनं चित्रित करून तिची वाट लावली. शकीलाबानू भोपाली या मशहूर कव्वाल गायिकेनं सत्तरच्या दशकातल्या 'हमराही' मध्ये अभिनय केला होता. त्यात ती स्वत: गायली नसली तरी 'जहर दे या जाम दे' ही मूळची तिची रचना. कल्याणजी आनंदजींनी फर्मास विनोदी ढंगात पेश केली होती. 'जंजीर' मध्ये प्राणवर चित्रित झालेल्या 'यारी है इमान' या कव्वालीनं तर लोकप्रियतेचा कळस गाठला. बिनाका गीतमालाच्या 'टॉप सरताज' गीताचा बहुमान (१९७३) पटकावणारी ही पहिली कव्वाली. दोनच वर्षांनी 'रोटी कपडा और मकान'च्या 'महंगाई मार गई'च्या रूपानं कव्वालीला हा बहुमान दुसऱ्यांदा मिळाला.

प्राणसाठीच आठवणीत असलेल्या 'धर्म' मधली 'राज की बात कह दूं' ही रफी - आशाची कव्वालीही धो धो गाजली. मात्र, त्यात श्रवणीयतेपेक्षा उथळपणाच अधिक होता.

'किशोर लाटे' मुळे पिछाडीस फेकल्या गेलेल्या मोहम्मद रफीला पुन्हा एकदा हात दिला तो सत्याहत्तर सालच्या 'परदा है परदा' (अमर अकबर अँथनी), अन् 'है अगर दुश्मन' (हम किसीसे कम नहीं) या अनुक्रमे 'एल. पी.' अन् 'आर. डी.' च्या कव्वालींनी.

सत्तर सालानंतर हिंदी चित्रपटसंगीताची परिमाणंच बदलून गेल्यानं कव्वालीचं रूपही पालटलं. उथळ सवालजवाब अन् वेषांतर करून गाण्याचा प्रकार एवढंच तिचं अस्तित्व राहिलं. संगीताच्या दर्जाला सर्वच बाजूंनी ओहोटी लागलेली असताना कव्वाली आपलं स्वत्व राखू शकली नाही, यांत नवल नव्हतं. हळुवारपणे गायली गेलेली गझल काय वा काहीशा आक्रमकतेनं म्हटली गेलेली कव्वाली काय, हिंदी चित्रपटसंगीतात या दोन्ही प्रकारांनी तेवढीच बहार आणली.

■ सुनील देशपांडे